| *CNR NO. MHRT090004582025* | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | १६/१२/२०२५ |
| | नोंदविल्याचा दिनांक | :- | १६/१२/२०२५ |
| | निकाल दिनांक | :- | **२४/०६/२०२६** |
| | कालावधी | :- | ० व.०६ म. ०८ दि. |

**<u>लांजा येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात,</u>**

**<u>ता. लांजा, जि. रत्नागिरी.</u>**

**(पीठासीन अधिकारी एस. आर. जोशी, दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,लांजा)**

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक २४/२०२५</u>**

**दिलीप चंद्रकांत खानविलकर,**
व.व.सु. ५७ वर्षे, धंदा- शेती,
रा. मु. पो. मराठी शाळेजवळ,
राववाडी लावगण,
ता. लांजा, जि. रत्नागिरी ..........**अर्जदार**

**<u>विरुध्द</u>**

१. **सुरेश चंद्रकांत खानविलकर,**
व. व. सु. ६४, धंदा- शेती,

२. **रजनी चंद्रकांत खानविलकर,**
व. व. सु. ८०, धंदा- गृहीणी,

३. **विनया विकास विचारे,**
व. व. सु. ५५, धंदा- गृहीणी,

४. **सुप्रिया राजेश खानविलकर,**
व. व. सु. ५४, धंदा- गृहीणी,

५. **रोहीत राजेश खानविलकर,**
व. व. सु. ३०, धंदा- नोकरी,

६. **अश्वीनी राजेश खानविलकर,**

व. व. सु. २८, धंदा– गृहीणी,

**७. ऋतुजा राजेश खानविलकर,**

व. व. सु. २३, धंदा– शिक्षण,

सर्व रा. मु. पो. मराठी शाळेजवळ,

राववाडी लावगण,

ता. लांजा, जि. रत्नागिरी **.........सामनेवाला**

**वारसा दाखला (Succession Certificate )मिळणेसाठी अर्ज.**

**उपस्थितीः–**

अर्जदार व सामनेवाला तर्फे विधीज्ञ – **श्री. आर. एम. देसाई**

**आदेश नि.१ वर**

**(पारित दिनांक २४/०६/२०२६)**

अर्जदार यांनी हा अर्ज इंडीयन सक्सेशन ॲक्ट अन्वये वारसा दाखला मिळणेसाठी केला आहे.

**०२. अर्जदार यांच्या अर्जाची थोडक्यात हकिकत अशी की,**

अर्जदार हा गाव मौजे लावगण, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथील कायमस्वरूपी रहिवासी आहे. अर्जदार व सामनेवाला क्र. १ व ३ चे वडील तर सामनेवाला क्र. २ चे पती व सामनेवाला क्र. ४ चे सासरे व सामनेवाला क्र. ५ ते ७ यांचे आजोबा चंद्रकांत परशुराम/पर्शुराम खानविलकर हे दि. ०६/०७/२०१० रोजी मु. पो. लावगण, ता. लांजा येथे मयत झाले आहेत. मयत चंद्रकांत परशुराम/पर्शुराम खानविलकर यांना अर्जदार व सामनेवाला क्र. १ हा मुलगा तर सामनेवाला क्र. ३ ही मुलगी, सामनेवाला क्र. २ ही पत्नी असून त्यांचे मुलगे राजेश व प्रफुल्ल हे अनुक्रमे दि. ०४/०९/२०१६ व दि. ०८/०९/२०१७ रोजी मयत झाले असून त्यापैकी राजेश याला सामनेवाला क्र. ४ ते ७ हे वारस आहेत तर प्रफुल्ल हा लग्न

होण्यापूर्वी मयत झाल्याने त्याला कोणीही वारस नाहीत. त्यामुळे अर्जदार व सामनेवाला हे मयत चंद्रकांत परशुराम/पर्शुराम खानविलकर यांचे कायदेशीर वारस असून अन्य कोणीही वारस नाहीत.

०३. मयत चंद्रकांत परशुराम/पर्शुराम खानविलकर यांचे नावे रत्नागिरी सिंधुदुर्ग ग्रामीण बँक शाखा वाडीलींबूची म्हणजेच आता नविन नावची महाराष्ट्र ग्रामीण बॅक शाखा वाडीलींबूची या शाखेत खालीलप्रमाणे मुदत ठेव रक्कम जमा होती परंतु, सदर मुदत ठेव रक्कमेस त्यावेळी नजर चुकीने नॉमीनी देणेचे राहून गेले होते. त्यामुळे आता सद्यस्थितीत ते मयत असल्याने सदर मुदत ठेव याचा कालावधी संपून गेला असून सदर मुदतठेव रक्कम त्यांचे वारसांना मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्जदार यांनी बँकेकडे अर्ज दाखल केला असता बॅकेने रक्कम रू. १,५०,०००/– पर्यंत रक्कमेसाठी कागदपत्र दिली. परंतु सदर रक्कम जास्त असल्याने वारस दाखला हजर करणेबाबत सांगितले. त्यामुळे अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. मुदतठेवींचा तपशिल खालीलप्रमाणे –

| **अ. क्र.** | **बँकेचे नाव** | **मुदत ठेव रक्कम** | **मुदतठेव पावती क्र.** | **ठेव तारीख** | **परत तारीख** |
|---|---|---|---|---|---|
| १. | रत्नागिरी सिंधुदुर्ग ग्रामीण बँक | १८,७३६.६३/– | ०३७५३२ | ०५/०७/२००५ | ०५/०७/२००८ |
| २. | | ३२,७८७/– | ०३७५२५ | १३/०६/२००५ | १३/०६/२००८ |
| ३. | | ५३,२२१/– | ०३७४५६ | २०/०८/२००४ | २०/१०/२००९ |

०४. सामनेवाला क्र. १ ते ७ यांना सदरचा अर्ज मान्य व कबूल असलेबाबत **निशाण १५** येथे पुरशिस दिलेली आहे.

०५. प्रस्तुत अर्जाचे पुष्ठयर्थ अर्जदार दिलीप चंद्रकांत खानविलकर यांनी स्वतःचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र **निशाण १६** येथे तसेच अर्जदार यांनी अधिकचा तोंडी पुरावा देणेचा नसल्याबाबत पुरशिस **निशाण २५** येथे दिलेली आहे.

०६. अर्जदार यांचे अर्जास कोणाचीही हरकत आहे किंवा कसे?, हे समजण्यासाठी दिनांक २७/१२/२०२५ रोजीचे दैनिक ''प्रहार'' या रत्नागिरी जिल्हयातील वृत्तपत्रामध्ये

जाहीर नोटीस प्रसिध्द करणेत आली. या वृत्तपत्राची अस्सल प्रत **निशाण ११** वर आहे. तसेच कोर्टाचे, तहसिलदार कार्यालय लांजा, पंचायत समिती लांजा, ग्रुप ग्रामपंचायत खानवली यांचे नोटीस बोर्डवर सार्वजनिक ठिकाणी येथे जाहीरनामा चिकटवून जाहीर प्रकटन करण्यात आले. तसा बेलीफ यांचा रिपोर्ट **निशाण ०७** वर आहे. याप्रमाणे जाहीर नोटीस व जाहीरनामा प्रसिध्द करुनही कोणाही इसमाने या कामी हजर होऊन अर्जदार यांचे अर्जास आक्षेप घेतलेला नाही.

**०७.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. युक्तिवाद ऐकला.

**०८.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिल्यानंतर व युक्तिवाद ऐकल्यानंतर माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील कारणमिमांसेसहित निष्कर्ष खालील प्रमाणेः–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणीप्रमाणे वारसा दाखला (Succession Certificate) मिळणेस पात्र आहेत का? | **होय.** |
| २. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबतः–**

**०९.** अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनांना पुष्ठी देण्यासाठी खालील कागदपत्र दाखल केलेली आहेत.

| **अनु. क्र.** | **कागद** | **निशाण** |
|---|---|---|
| १. | रत्नागिरी सिंधुदुर्ग ग्रामीण बँक ठेव पावती क्र. ०३७५३२ ची व्हेरीफाईड प्रत | **१७** |
| २. | रत्नागिरी सिंधुदुर्ग ग्रामीण बँक ठेव पावती क्र. ०३७५२५ ची व्हेरीफाईड प्रत | **१८** |
| ३. | रत्नागिरी सिंधुदुर्ग ग्रामीण बँक ठेव पावती क्र. ०३७४५६ ची | |

| | | |
|---|---|---|
| | व्हेरीफाईड प्रत | **१९** |
| ४. | मयत चंद्रकांत पर्शुराम खानविलकर यांचे मृत्यू दाखल्याची व्हेरीफाईड प्रत | **२०** |
| ५. | मयत प्रफुल्ल चंद्रकांत खानविलकर यांचे मृत्यू दाखल्याची व्हेरीफाईड प्रत | **२१** |
| ६. | मयत राजेश चंद्रकांत खानविलकर यांचे मृत्यू दाखल्याची व्हेरीफाईड प्रत | **२२** |
| ७. | गाव नमुना सहा 'क' उतारा | **२३** |
| ८. | अर्जदारचे आधारकार्डची व्हेरीफाईड प्रत | **२४** |

**१०.** **निशाण १७, १८ व १९** येथील रत्नागिरी सिंधुदुर्ग ग्रामीण बँकेचे डबल बेनिफिट डीपॉझीट सर्टिफिकेट अनुक्रमे क्र. ०३७५३२, ०३७५२५ व ०३७४५६ या व्हेरीफाईड प्रतींचे अवलोकन केले असता ते मयत चंद्रकांत परशुराम खानविलकर यांचे नावे असल्याचे दिसून येते. **निशाण २०** येथील मयत चंद्रकांत पर्शुराम खानविलकर यांचे मृत्यू दाखल्याच्या व्हेरीफाईड प्रतीचे अवलोकन केले असता त्यांचा मृत्यू दि. ०६/०७/२०१० रोजी झाल्याचा दिसून येतो. **निशाण २१** येथील मयत प्रफुल्ल चंद्रकांत खानविलकर यांचे मृत्यू दाखल्याच्या व्हेरीफाईड प्रतीचे अवलोकन केले असता त्यांचा मृत्यू दि. ०८/०९/२०१७ रोजी झाल्याचा दिसून येतो. **निशाण २२** येथील मयत राजेश चंद्रकांत खानविलकर यांचे मृत्यू दाखल्याच्या व्हेरीफाईड प्रतीचे अवलोकन केले असता त्यांचा मृत्यू दि. ०४/०९/२०१६ रोजी झाल्याचा दिसून येतो. **निशाण २३** येथील गाव मौजे लावगण, ता. लांजा यांचेकडील गाव नमुना सहा 'क' उताऱ्याचे अवलोकन केले असता मयत चंद्रकांत पर्शराम खानविलकर हे दि. ०६/०७/२०१० रोजी मयत असून त्यांचे वारसांची नावाची नोंद दिसून येते. **निशाण २४** येथे अर्जदार यांचे आधारकार्डची व्हेरीफाईड प्रत दाखल केलेली आहे.

**११.** अर्जदार दिलीप चंद्रकांत खानविलकर यांनी याकामी स्वतःचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र **निशाण १६** येथे दाखल केलेले आहे. प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा अर्जातील कथने

व दाखल कागदपत्रे यांचेशी सुसंगत आहे. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी याकामी दाखल केलेली कागदपत्रे पाहता अर्जदार यांनी याकामी दाखल केलेला तोंडी व लेखी पुरावा हा अर्जदारचे अर्जातील अभिकथनांना पुष्टी देणारा आहे. अर्जातील या कथनांबाबत कोणीही वाद केलेला नाही. त्यामुळे, ती कथने अबाधित राहिली आहेत.

**१२.** एकंदरीत अभिलेखातील कागदपत्रे ही अर्जदार यांनी त्यांचे अर्जात केलेल्या कथनांस पुष्टी देतात. अर्जदार यांच्या कथनास कोणाही इसमाने या कामी हजर होऊन विरोध केलेला नाही. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली असता अर्जदार यांच्यावर विश्वास ठेऊ नये, असा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर नाही. म्हणून वरील सर्व बाबींचा विचार करता असे दिसून येते की, अर्जदार व सामनेवाला क्र. १ ते ७ हे मयत चंद्रकांत परशुराम/पर्शुराम खानविलकर यांचे वारस असल्याबाबतचा वारसा दाखला अर्जदार व सामनेवाला क्र. १ ते ७ यांच्या नावे देणे न्यायोचीत ठरेल. सबब अर्जदार व सामनेवाला क्र. १ ते ७ यांना मयत चंद्रकांत परशुराम/पर्शुराम खानविलकर यांचे वारस असल्याबाबतचे वारसा दाखला देण्यास कोणतीही अडचण नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :–

## आ दे श

**०१.** अर्ज मंजूर करणेत येतो.

**०२.** **अर्जदार दिलीप चंद्रकांत खानविलकर, सामनेवाला क्र. १ सुरेश चंद्रकांत खानविलकर, सामनेवाला क्र. २ रजनी चंद्रकांत खानविलकर, सामनेवाला क्र. ३ विनया विकास विचारे, सामनेवाला क्र. ४ सुप्रिया राजेश खानविलकर, सामनेवाला क्र. ५ रोहीत राजेश खानविलकर, सामनेवाला क्र. ६ अश्वीनी राजेश खानविलकर व सामनेवाला क्र. ७ ऋतुजा राजेश खानविलकर** हे **मयत चंद्रकांत परशुराम/पर्शुराम खानविलकर** यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**०३.** अर्जदाराने याकामी अर्जात नमूद रत्नागिरी सिंधुदुर्ग ग्रामीण बँक शाखा वाडीलिंबू म्हणजेच आता नविन नावची महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा वाडीलिंबू या शाखेतील

मुदतठेव पावती क्र.०३७५३२, ०३७५२५ व ०३७४५६ ची अंतिम जमा रक्कम तसेच व्याजासहीत होणारी अंतिम रक्कम बॅकेच्या अधिकृत अधिकाऱ्याकडून घेवून सदरचा वारसा दाखला घेतेवेळी सादर करून भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३०५ अन्वये अर्जदार यांचे नावे त्यांनी योग्य ती कोर्ट फी दाखल केल्यानंतर वारसा दाखला देणेत यावा.

**०४.** सदर वारसा दाखल्याचा वापर केवळ वर नमुद केलेल्या कारणाकरीताच करावयाचा आहे.

**०५.** अर्जदार व सामनेवाला क्र. १ ते ७ यांनी त्यांचा ओळखीचा पुरावा दाखल करावा.

**०६.** भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५ तसेच दिवाणी नियमावली, परिच्छेद क्र.३०८ अन्वये अर्जदारांनी वारस पत्रासाठी शुल्क कोर्ट फी स्टॅम्पद्वारे भरावे तसेच भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५ व दिवाणी नियमावली, परिच्छेद क्र.३१० अन्वये नमूद नियमावली अनुसार वारसपत्र अर्जदार यांना देणेत यावे.

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.06.24 14:21:05 +0530

**दिनांकः– २४/०६/२०२६.** **(एस. आर. जोशी)**

**ठिकाणः– लांजा.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, लांजा,**

**जि.रत्नागिरी.**

| **<u>CERTIFICATE</u>** | | |
|---|---|---|
| Judgment/Order in :- **Order on Exh. 01** in **Civil M.A. 24/2025** | | |
| I affirm that the contents of this pdf file Judgment/ Order are same word as per original Judgment/ Order. | | |
| Name of Stenographer | :- | S. D. Chavan |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Lanja |
| Date of decision | :- | 24/06/2026 |
| Order Signed by P.O. on | :- | 24/06/2026 |
| Order uploaded on | :- | 24/06/2026 |